Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# स्वराज्याच्या उत्पन्नाची साधने: चौथाई व सरदेशमुखी



**प्रा. डॉ. राजेंद्रसिंग हिरासिंग देवरे**
इतिहास विभाग प्रमुख
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा जि. बुलडाणा

---

मध्ययुगीन कालखंड हा लष्करी बळावर राज्य करण्याचा कालखंड असल्यामुळे हिंदवी स्वराज्याची अर्थव्यवस्था प्रबळ असणे गरजेचे होते. जमीन महसूल, जकात कर, टाकसाळीतील उत्पन्न किंवा इतर कर इत्यादी माध्यमातून स्वराज्याला उत्पन्न मिळत असले, तरी डॉ. सेन यांच्या मते, "शिवाजीची गंगाजळी भरत होती, ती चौथ आणि सरदेशमुखीच्या उत्पन्नातून.[1] याचा अर्थ चौथ अथवा चौथाई व सरदेशमुखी ही स्वराज्याच्या उत्पन्नाची प्रमुख साधने होती आणि या दोन बाबींपासून स्वराज्याला शिवकाळापासून पेशवाईपर्यंत सतत उत्पन्न मिळत असल्याचे दिसते. त्यामुळे प्रस्तुत शोध निबंधात स्वराज्याच्या उत्पन्नाची प्रमुख साधने असलेल्या चौथाई आणि सरदेशमुखीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**चौथाई :-**

चौथाई हा स्वराज्याच्या उत्पन्नाचा एक भाग होता, मात्र तो नियमित मिळणा-या करांप्रमाणे नव्हता. कारण, सामर्थ्यवान राज्याने दुर्बल राज्यातील जनतेकडून वसूल करावयाचा तो एक जादा अधिकार अथवा कर होता, मात्र त्यामुळे स्वराज्याची अर्थव्यवस्था स्थिर होण्यास मदत झाली, एवढे निश्चित. चौथाई म्हणजे उत्पन्नाचा 1/4 भाग असून कोणत्याही नियमावर आधारित नसलेली, परंतु स्वराज्याच्या हितासाठी लष्करी सामर्थ्यवान शत्रूकडून वसूल केलेली एक प्रकारची खंडणी होती. चौथाई या संकल्पनेबाबत तज्ज्ञांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

- सतिशचंद्र : Shivaji supplemented his income by living a contribution on the neighbouring Mugal territories. This contribution which came to one fourth of the land revenue began to be called Chouthai (one -fourth) or Chouth.[2]
- पी. एस. पिसुर्लेकर : चौथाई म्हणजे उत्पन्नाचा चौथा हिस्सा नसून काही तरी हिस्सा समजावयाचा.[3]
- डॉ. एस. एन. सेन : चौथाई म्हणजे शत्रूपासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण होण्यासाठी किंवा लुटमारीपासून संरक्षण मिळण्यासाठी द्यावयाचा कर होय.[4]
- गो. स. सरदेसाई : चौथाईच्या हक्काचे स्वरूप वेगळे असल्यामुळे हा हक्क जिंकलेल्या प्रदेशातून किंवा शत्रूच्या प्रदेशातून वसूल केल्या जात असे.[5]
- न्या. रानडे : सरदेशमुखी जसे वतन होते, तसे चौथाई वतन नव्हते, तर देशात शांतता ठेवणे व परचक्रास प्रतिबंध करणे या कामगिरीबद्दल दिलेले ते 'वेतन' होते.[6]
- डॉ. अ. रा. कुलकर्णी : चौथ या शब्दाचा अर्थ 1/4 असा असला, तरी प्रत्यक्षात त्याची वसुली गावच्या उत्पन्नाच्या 10 ते 15 टक्क्यापर्यंत कोठेतरी निश्चित केलेली दिसते.[7]

### चौथाई नाव कसे पडले ? :

चौथाई म्हणजे उत्पन्नाच्या चौथा हिस्सा कर म्हणून वसूल केला जात असे. त्यावरून 'चौथाई' हे नाव पडले, असे सर्वसामान्यपणे मानले जाते. शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम पोर्तुगिजांकडून चौथाई वसूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र पिसुर्लेकर म्हणतात की, "चौत्या नावाचा (रामनगरचा) राजा दमण जवळील डोंगराळ भागात राज्य करीत होता. त्यास सभोवतालचे लोक कर देत असत. त्या कराचे नाव चौत्याच्या नावावरून 'चौत' किंवा 'चौथ' पडले." त्यास दुजोरा मनुचीच्या आत्मवृत्तातही मिळतो. त्यामध्ये मनुचीस जयसिंगाने दौ–यावर पाठविले असता, तो रामनगर व इतर आसपासच्या राजांना भेटला. त्यात चुतियाचा राजा एक होता. त्यावरून चौत वा चौथ म्हणजे चुतियास द्यावयाचा कर हा शब्द रुढ झाला. त्याचे रूपांतर पुढे कदाचित 'चौथ' वा 'चौथाई मध्ये झाले असावे.[8] उपरोक्त विवेचनावरून 'चुतियाचा राजा' यास दिल्या जाणा–या करावरून चौथाई हे नाव पडल्याचे दिसते. नंतर मात्र या करामध्ये उत्पन्नाचा चौथा हिस्सा अपेक्षित असावा.

### चौथाईच्या उत्पत्तीचा इतिहास:

पिसूर्लेकरांच्या व्यतिरिक्त इतर विद्वानांचे मत लक्षात घेतले असता, चौथाई म्हणजे उत्पन्नाच्या चौथा हिस्सा होय आणि हा हक्क शिवपूर्वकाळापासून अस्तित्वात होता, असे दिसते.

रामनगर येथे राणे नावाचा राजवंश होता. या रामनगरच्या राजाला पोर्तुगीज त्यांच्या ताब्यातील मुलखापैकी दमण जिल्हयातील गावांमधून दरवर्षी काही कर गोळा करून देत असे. वनवासी जमातीने आपल्यावर छापे घालू नये, म्हणून या गावांमधून पोर्तुगीज अमलाच्या पूर्वीपासून हा कर रामनगरच्या राजाला दिला जात होता. तिच पध्दत पोर्तुगीज अमलातही चालू होती आणि त्या करालाच 'चौथ' असे नाव पडले.[9] साधारणत: इ. स. 1559 सालापासून पोर्तुगीज रामनगरच्या राजाला चौथाई कर देत असे.[10] पुढे या रामनगरच्या राजाविरुध्द जव्हारच्या कोळी राजाने बंड केले आणि त्याने पोर्तुगिजांकडे रामनगरच्या राजाला दिल्या जाणा–या 'चौथ' कराची मागणी केली. रामनगरच्या राजाला कोळी राजाचे बंड न मोडता आल्यामुळे पोर्तुगिजांनी कोळी राजाचे बंड मोडण्यासाठी शिवाजी महाराजांना विनंती केली. त्यानुसार मोरोपंत पिंगळे याने जून व जुलै 1672 मध्ये रामनगर व जव्हारचा प्रदेश ताब्यात घेतला. रामनगरचा प्रदेश काबीज केल्यानंतर साहजिकपणे रामनगरच्या राजाला देण्यात येणा–या चौथाईची मागणी शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांकडे केली.[11] तसेच पोर्तुगीज आपल्या ताब्यातील मुलखापैकी वसई जिल्हयातील गावांमधून 'गावखंडी' नावाचा कर वसूल करून तो जव्हारच्या राजाला देत असे. ज्या कारणासाठी

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

रामनगरच्या राजाला चौथ दिली जाई, त्याच कारणांसाठी जव्हारच्या राजाला गावखंडी दिली जात असावी. त्यामुळे शिवाजी महाराजांनी पोर्तुगिजांकडे चौथसोबत गावखंडीचीही मागणी करायला सुरूवात केली होती.[12] पुढे काही काळ गेल्यानंतर (राज्याभिषेकानंतर) चौथची कायमस्वरूपी व्यवस्था ठरविण्यासाठी शिवाजी महाराजांनी आपला वकील पितांबर शेणवी गुळगुळे यास 1677 च्या डिसेंबरमध्ये गोव्यास पाठविले. पुढील वर्षी तो मरण पावल्यानंतर त्याचा नातू शिवाजी शेणवी याची वकील म्हणून नेमणूक केली. त्यानंतर 15 मार्च 1679 रोजी परत चौथाईच्या कामासाठी आपला वकील गणेश भट यास गोव्यास पाठविले. तेव्हा गोवा सरकारने शिवाजी महाराजांची चौथाईची मागणी मान्य केली, परंतु प्रत्यक्ष रक्कम सालोसाल दिल्याचा दाखला मिळत नाही.[13]

वरील प्रमाणे चौथ पध्दतीचा उगम कसा झाला? याचा विचार केला असता दिसून येते की, दमणचे नागरीक रामनगरच्या राजाला आपल्या प्रदेशात शांतता -सुव्यवस्था ठेवण्याच्या बदल्यात 12 1/2% पासून 17% पर्यंत चौथ देत असत.[14] हिच प्रथा पुढे पोर्तुगिजांनी दमण जिंकून घेतल्यानंतरही कायम ठेवली. त्यामुळे चौथाईच्या जनकत्वाचा मान शिवाजी महाराजांना नव्हे, तर रामनगरचे राजे आणि त्यानंतर पोर्तुगीज यांना द्यावा लागतो. तसेच चौथाई म्हणजे महसुलाच्या 25% नसून सुरूवातीला 12 1/2 % टक्क्यापासून हा कर दिल्या जात होता. त्यामुळे चौथाई म्हणजे उत्पन्नाचा चौथा हिस्सा ही संकल्पना पुढील काळात उदयास आल्याचे दिसते.

चौथ आकारणीच्या संदर्भात असे म्हटले जाते की, सुरत शहराची लूट करण्यापूर्वी शिवाजी महाराजांनी सुरतेच्या गव्हर्नरकडे सुरत शहर व आसपासच्या मुलखातून मोगल बादशहास मिळणा–या उत्पन्नापैकी चौथ्या हिश्याची मागणी केली होती.[15] त्यामुळे डॉ. सेन देखील म्हणतात की, "सुरतेवर चाल करून जाताना त्याला वाटेत रामनगरच्या राजाचा प्रदेश लागला आणि या चौथियाच्या राजापासून शिवाजीने चौथची कल्पना घेऊन तिचा पहिला प्रयोग सुरत गव्हर्नरकडे केला असावा.'[16] यावरून पोर्तुगिजानंतर शिवाजी महाराजांनी सुरतवर चौथ लादण्याचा प्रयत्न केला, परंतु चौथची संकल्पना ही शिवाजी महाराजांपूर्वीच प्रचलित असल्याचे दिसते. एवढे मात्र खरे की, स्वराज्याच्या उत्पन्न वाढीसाठी पुढील काळात या पध्दतीला शिवाजी महाराजांनी सुव्यवस्थितपणा आणून संरक्षणाच्या बदल्यात चौथाई वसूल केल्याचे दिसते. अर्थातच या वसुलीबद्दल अथवा हक्काबद्दल कोणत्याही प्रकारचा कायदेशीरपणा दिसत नसला, तरी शिवाजी महाराजांनी चौथाई वसूल करताना एक नौतिक जबाबदारी स्वीकारून तिची अंमलबजावणी केल्याचे दिसते. त्यासाठी मराठे ज्या प्रदेशातून चौथाई वसूल करीत असे, त्या प्रदेशातील जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास देत नसे, जर एखाद्या राजाने अथवा त्या प्रदेशातील जनतेने चौथाई देण्याचे नाकारले, तर शिवाजी महाराज तो प्रदेश जाळपोळ करून लूटत असे. या संदर्भात 'इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी' या ग्रंथात 14 फेब्रुवारी 1679/80 ला चोपडयाहून सुरतेस लिहिलेल्या पत्रात उल्लेख सापडतो की, "शिवाजीच्या सैन्याने हा प्रदेश लुटून व जाळून फस्त केला. ज्या शहराचे लोक त्यास चौथाई देण्याचे कबूल करतात, त्या लोकांस शिवाजी कोणत्याही प्रकारचा उपसर्ग देत नाही."[17]

मोगल बादशहाच्या मुलखावर शिवाजी महाराज स्वा––या करीत असत, त्याचा मुख्य हेतू त्या प्रदेशाच्या उत्पन्नापौकी चौथा हिस्सा वसूल करणे, हा होता. त्यांच्या या हेतूस अनुसरून चौथाई उत्पन्न देण्याचे त्या प्रदेशातील लोकांनी कबूल केले, तर त्याची लूट अगर जाळपोळ शिवाजी महाराज करीत नव्हते आणि अशा लोकांकडून चौथाई देण्याचे करार करून घेण्याचा त्याचा प्रघात असे.[18] 24 फेब्रुवारी 1680 ला चोपडेकर इंग्रजांनी सुरतेला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, 'शिवाजीचे सैन्य चौथाई देतील अशा गावांना त्रास देत नाही. बाकी या भागात त्याने सरसहा लूट केली.'[19] म्हणजे चौथाई हा नियमित स्वरूपाचा अथवा आपल्या प्रदेशातील जनतेकडून वसूल केला जाणारा कर नसून प्रबळ राजाने शेजारच्या जनतेकडून तिच्या संरक्षणाच्या बदल्यात वसूल करावयाचा लष्करी शक्तिवर आधारित एक कर होता. म्हणून कदाचित सर जदुनाथ सरकार यांनी " शिवाजी महाराजांची चौथाई म्हणजे एक प्रकारची 'खंडणी'च होती आणि ही खंडणी त्याचे सैन्य नियमितपणे दरवर्षी वसूल करीत असल्याचे म्हटले

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

आहे."[20] जदुनाथ सरकार यांनी 'खंडणी' हा शब्द वापरला तो योग्य की अयोग्य याचा विचार केला असता, शिवाजी महाराजांनी विजापूरकरांच्या मुलखात चौथाई वसूल करण्यास इ. स. 1661 मध्ये व मोगलाईत इ. स. 1663 मध्ये सुरूवात केली ती विजापूरकरांच्या बरोबर करार - मदार करून झाली नव्हती, तर ती वसुली त्याने मनगटाच्या जोरावर चालविली होती. तिला प्रथम लूटीचे स्वरूप होते, मागाहून त्याने चौथाईचे स्वरूप दिल्याचे दिसते.[21]

चौथ या पध्दतीपासून शिवकाळात स्वराज्याला किती उत्पन्न मिळत होते? हे सांगणे कठीण असले, तरी सभासदाच्या मते, "चौथाईपासून शिवाजी राजांना 80 लाख होन उत्पन्न मिळत होते."[22] सरदेसाई लिहितात की, "विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनी शिवाजीस चौथाई व सरदेशमुखी या हक्कांबद्दल दरसाल अनुक्रमे तीन लाख व पाच लाख रु. देण्याचे कबूल केले. हे हक्क तो पुष्कळ दिवस मागत होता, पण त्यास ते राजरोसपणे मिळाले आणि सालोसाल खंडणी वसूल होऊ लागली होती आणि हे वर्ष इ. स. 1668 होते.[23] पुढे शाहू महाराजांच्या काळात दिल्लीच्या मोगल बादशहाकडून मराठयांना चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मिळाल्याने मराठा सत्तेचा देशभर प्रसार होण्यास मदत झाली. त्यामुळे चौथपासून मिळणारे उत्पन्न ही सरकारच्या कायमस्वरूपी उत्पन्नाची बाब असून आपल्यावर हल्ला होऊ नये, यासाठी दुर्बल सत्ता प्रबळ सत्तेला वार्षिक रक्कम देणगी देऊन आपल्या प्रदेशाचे संरक्षण करीत असे.

**सरदेशमुखी :-**

चौथाई अणि सरदेशमुखी या सरकारी उत्पन्नाच्या खास बाबी, परंतु दोहोंच्या वसुलीच्या स्वरूपात फरक होता. कारण शिवकाळात मराठा राज्याचा प्रदेश दोन भागात विभागला होता.

1) स्वराज्य: प्रत्यक्ष छत्रपतीच्या अमलाखालील प्रदेश.

2) मोगलाई: मोगलांच्या ताब्यातील मात्र छत्रपतींचे वर्चस्व मान्य केलेला प्रदेश होय.

यापैकी चौथाई ही परमुलखातून म्हणजे मोगलाईतून वसूल केल्या जात असे, तर सरदेशमुखी राजाचा खास हक्क म्हणून स्वामी या नात्याने स्वराज्याच्या मुलखातून अथवा अंकीत मुलखातून वसूल केल्या जात होती.[24]

शिवाजी महाराजांनी चौथाईप्रमाणे सरदेशमुखी उत्पन्नाची एक बाब म्हणून निर्माण केली. सरदेशमुखीच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही. कारण देशमुखावर सरदेशमुख हे वतनदार पूर्वीपासून होते.[25] चौथाईचा दर हा सामान्यत: एकूण महसुलाच्या 1/4 रक्कम इतका होता. तर सरदेशमुखी ही स्वराज्यातून जो सरकारी महसूल वसूल केल्या जात असे, त्याच्या 1/10 रक्कम ही राजाकडे खाजगी तिजोरीत त्यांच्या वैयक्तिक खर्चासाठी म्हणून जमा केली जात होती.[26] या संदर्भात डॉ. सेन यांनी वारसदारीने आजोबाच्या सिंहासनावर आरूढ होण्यापूर्वी सरदेशमुख या संबंधीचे शाही फर्मान त्यांना न मिळाल्याने सरदेशमुखी हे शिवाजीचे वतन आहे, असे त्या काळात मानण्यात आले नाही, असे म्हणतात.[27] म्हणजेच चौथाई ही राज्याच्या उत्पन्नाचे साधन होते आणि चौथाईच्या माध्यमातून झालेली वसुली ही राजकोषात जमा केली जाई, तर सरदेशमुखी ही राजाच्या खाजगी उत्पन्नाची बाब असून सरदेशमुखीतून वसूल होणारे उत्पन्न राजाच्या वैयक्तिक गरजांच्या पूर्ततेसाठी वापरले जात होते.

सरदेशमुखीचा हक्क हा कोणी सुरू केला ? याचा विचार केला असता, शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वी कोकणातील देसाई म्हणजे परगणा प्रमुख किंवा परगण्याचे स्वामी, हे आपल्या रयतेकडून सरदेशमुखी वसूल करीत असे. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या ताब्यात हा प्रदेश आल्यानंतर त्यांनी पूर्वीच्या देसायांप्रमाणे सरदेशमुखीचा हक्क मागायला सुरूवात केली.[28] यावरून शिवाजी महाराजांपूर्वी कोकणातील देसाई हे आपल्या प्रदेशातील जनतेकडून सरदेशमुखी जमा करीत होते. पुढे शिवाजी महाराज या प्रदेशाचे स्वामी बनल्यामुळे त्यांनी सरदेशमुखीची मागणी केल्याचे दिसून येते.

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

**सरदेशमुखी मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांनी केलेले प्रयत्न :**

सरदेशमुखी वतन मिळविण्यासाठी शिवाजी महाराजांनी वेळोवेळी प्रयत्न केल्याचे दिसते. इ. स. 1650 मध्ये त्यांनी मोगल बादशहा शहाजहानकडे जुन्नर व अहमदनगरची सरदेशमुखी वंशपरंपरेने द्यावी, अशी मागणी केली, पण ती नाकारण्यात आली. त्यानंतर इ. स. 1657 मध्ये औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार असताना त्याच्याकडे सरदेशमुखीची मागणी केली, परंतु मोगल वारसा युध्दामुळे तोही प्रयत्न अयशस्वी झाला. पुन्हा इ. स. 1665 ला पुरंदर तहाच्यावेळी मिर्झा राजे जयसिंहासोबत वाटाघाटीच्यावेळी सरदेशमुखी वतनाची मागणी करून 40 लाख पेशकस 13 हप्त्यात देण्याचे मान्य केले होते. पण हे प्रकरणही अपूर्णच राहिले. इ. स. 1666 ला आग्रा भेटीच्या वेळीही अपयश आले. त्यानंतर इ. स. 1667 मध्ये मोगल बादशहाने शिवाजी महाराजांना मोगल प्रांतात 'जहागिरी' व 'राजा' हा किताब दिला, परंतु सरदेशमुखी दिली नाही.[29]

अशारितीने शिवाजी महाराज हे वडिलोपार्जित जहागिरदार असल्याने इतर घाटगे, निंबाळकर, डफडे, सावंतवाडीचे भोसले आणि सिंदखेडकर जाधव या घराण्यांप्रमाणे आपणासही देशमुखी वतन असावे, असे त्यांना वाटत होते. देशमुख घराण्याच्या बरोबरीचा हक्क आपणास मिळावा, एवढेच नव्हे तर महाराष्ट्रामध्ये आपणास सरदेशमुखीचे वतन मिळावे अशी त्यांची इच्छा होती.[30] त्यामुळे मोगल बादशहाकडून शिवाजी महाराजांनी सरदेशमुखी वतन मिळविण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यामध्ये कधीही यश आल्याचे दिसत नाही. औरंगजेब बादशहाने शिवाजी महाराजांना सरदेशमुखी नाकारण्यामागे कदाचित त्यांचा आर्थिक लाभ होऊ नये, हा उद्देश असावा. कारण सरदेशमुखी वतन हा खास हक्क असल्याने आणि शिवाजी महाराजांची एकूणच कार्यपध्दती पाहता, त्यांचे या प्रदेशावर वर्चस्व निर्माण होईल, अशी भीती औरंगजेबास वाटत असावी.

सरदेशमुखीच्या संदर्भात दादोजी कोंडदेव याने इ. स. 1645 मध्ये बाबाजी झुंजारराव देशमुख तर्फ कानदखोरे यांना पत्र लिहिले, त्यामध्ये वर्णन आहे की, "तुझे अंतुरली येथील इनाम सरदेशमुखीस दिले. त्याबद्दल तुला दापोडी येथे इनाम देण्याविषयी लिहिले आहे. याचा अर्थ बाबाजी हा कानदखो–याचा देशमुख होता. त्याबद्दल अंतुरली गाव त्याकडे होते, परंतु ते त्याच्याकडून काढून दादोजीने दुस–या कोणत्यातरी सरदेशमुखास दिले. त्यामुळे बाबाजीचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी दादोजीने बाबाजीस दापोडी गाव इनाम देऊन त्यांचे झालेले नुकसान भरून काढले.[31] दुसरे एक उदाहरण सापडते की, रत्नागिरी जिल्हयात मामले प्रभावळीत मावळंगकर हे सरदेशमुख होते. प्रभावळीकरांना जिंकून त्यांचे राज्य शिवाजीने घेतल्यावर त्याने जी वतने अनामत ठेवली त्यात मावळंगकराचे सरदेशमुखीचे वतन असून ते आपणाकडे पुढे चालावे, असा अर्ज मावळंगकरांनी शिवाजी महाराजांकडे केला होता (21 एप्रिल 1662) व त्याप्रमाणे शिवाजीने त्यास ते वतन परत दिलेही. त्याच सुमारास शिवाजी महाराज स्वत:स आपल्या राज्यातील देशमुखांचा 'सरदेशमुख' म्हणवू लागला व त्याप्रमाणे कल्याणास नारो भिकाजी सुभेदार याजकडे जी कामगिरी होती, तीत सरदेशमुखीचा हक्क वसूल करणे असल्याचे दिसून येते.[32] चेऊल मामल्यातील लोकांची गनिमाने संपूर्ण भूमी उध्वस्त केल्यामुळे इ. स. 1687 च्या सुमारास चेऊलच्या देशमुखाने सरकारकडे फिर्याद करून शेतसारा आणि सरदेशमुखीची सूट मागितली होती. सुभेदाराने ही विनंती मान्य करून रयतेला ज्या अनेक सवलती दिल्या, त्यामध्ये 'सरदेशमुखी''ची एक सूट होती. स्थानिक अधिका–यांना कळविण्यात आले की, जमाबंदीच्यावेळी सरदेशमुखीची आकारणी करावी व पत्रकात नोंद करावी, पण ती वसूल करू नये किंवा वसुलीसाठी कोणाला उपद्रव देऊ नये.[33]

**निष्कर्ष :**

स्वराज्याच्या उत्पन्नाची एक प्रमुख बाब म्हणून शिवाजी महाराजांनी शत्रू अथवा दुर्बल राजाकडून चौथाई घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे चौथाई म्हणजे बलवानाने दुर्बलाकडून वसूल केलेली 'लूट' असेच म्हणावे लागेल. सुरूवातीला चौथाई ही लूट म्हणून वसूल केल्या जात असे. कालांतराने त्यास 'चौथाई' म्हटल्या जाऊ लागले. तसेच शिवाजी महाराजांना द्रव्याची गरज होती, ती गरज ओळखून त्यांनी या लुटीलाच चौथाईच्या निमित्ताने कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन बनविले, मात्र चौथाई वसूल

 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

करताना ज्या प्रदेशातून चौथाई वसूल केली. त्या प्रदेशातील जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास न देता, उलट संरक्षण दिले. त्यामुळे अ. रा. कुलकर्णी म्हणतात, "चौथ देण्याबाबत सरकारपेक्षा लोकांचाच पुढाकार अधिक होता, असे दिसते."[34]

सरदेशमुखी ही काही ठिकाणी शिवाजी महाराजांपूर्वीच अस्तित्वात असून स्वराज्याची स्थापना झाल्यानंतर छत्रपती स्वत: स्वराज्याचे सरदेशमुख झाले व आसपासच्या प्रदेशात मोगलांकडून सरदेशमुखी मिळविण्यासाठी प्रयत्न करू लागल्याचे दिसते. कारण तत्काळात 'सरदेशमुख' असणे, हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात होते. सरदेशमुख झाल्यानंतर आपले वतन ते पाहिजे त्यास देऊ शकत असे. परगण्यात देशमुखांचे जे काम तेच काम सरदेशमुखास करावे लागे. उदा. जमीन महसूल जमा करून तो सरकारात जमा करणे. चोरास शिक्षा देणे, चोराकडील ज्याचा माल त्यास देणे इत्यादी. या कामगिरीबद्दल त्यास 10% उत्पन्न मिळे व ते त्याच्या खाजगी उत्पन्नात जमा होई. डॉ. सेन यांनी मात्र चौथाई आणि सरदेशमुखीला स्वराज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन मानले आहे, परंतु संशोधनाअंती सरदेशमुखी हे स्वराज्याच्या उत्पन्नाचे साधन नसून ते छत्रपतींच्या खाजगी उत्पन्नाचे साधन असल्याचे दिसते, मात्र कोणत्याही छत्रपतींनी स्वराज्यासाठी खाजगी उत्पन्न व स्वराज्याचे उत्पन्न असा कधीही भेद केल्याचे दिसत नाही. कधीही चैनी-विलासी जीवन जगल्याचेही दिसत नाही. शिवाजी महाराजांच्या पश्चात शाहू महाराजांनी इ. स. 1719 मध्ये मोगल बादशहांकडून चौथाई व सरदेशमुखीचा हक्क सनदाच्या रूपाने मिळविला होता.[35] चौथाई व सरदेशमुखीतून स्वराज्याला किती उत्पन्न मिळत मिळत होते, स्पष्ट होत नसले, तरी ही स्वराज्याच्या उत्पन्नाची प्रमुख साधन असल्याचे दिसते.

**संदर्भ सूची : -----------------------------------------------------------------------------------------------------------------**


1) कुलकर्णी विजया (अनु.), मराठयांची प्रशासन व्यवस्था, म. रा. सा. आणि स. मंडळ, मुंबई, 2003, पृ. 43

2) Satishchandra, A History of Medival India, 1978 P. 234

3) भावे वा. कृ., शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, 2004, पृ. 173

4) कुलकर्णी विजया (अनु.), पूर्वोक्त, पृ. 45

5) गवळी पी. ए., मराठयांचा इतिहास, 1999, पृ.135

6) रानडे म. गो., मराठी सत्तेचा उत्कर्ष, वरदा बुक्स, पुणे, 1995, पृ. 171

7) कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, 2004, पृ.173

8) भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. 173

9) मेहेंदळे ग. भा., राजा शिवछत्रपती खंड-01, भाग-1, पुणे, 1996, पृ. 124

10) कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ.134

11) कित्ता, पृ. 134

12) मेहेंदळे ग. भा., पूर्वोक्त, पृ. 134

13) गर्गे स. मा. (संपा.), मराठी रियासत, खंड-1, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1988, पृ. 282

14) भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. 172

15) भट भा. वा., शिवाजीची राजनीती, इ. वि. का. राजवाडे मंडळ, धुळे, 2010, पृ. 141

16) कुलकर्णी विजया (अनु.), पूर्वोक्त, पृ. 45

17) भट भा. वा., पूर्वोक्त, पृ. 141

18) कित्ता, पृ. 142

19) बेंद्रे वा. सी., छत्रपती शिवाजी महाराज, उत्तरार्ध, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, 2013, पृ. 495


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.

20) विजया कुलकर्णी (अनु.), पूर्वोक्त, पृ.45

21) भट भा.वा., पूर्वोक्त, पृ.163-164

22) पठाण यू. म. (संपा.), श्री शिवप्रभूंचे चरित्र (सभासद बखर), समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, 1974, पृ. 46

23) गर्गे स. मा. (संपा.), पूर्वोक्त, पृ. 265

24) कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ. 137

25) भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. 174-175

26) कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ.137

27) कुलकर्णी विजया (अनु.), पूर्वोक्त, पृ. 44

28) कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ.137

29) रानडे म. गो., पूर्वोक्त, पृ. 164-166

30) कित्ता, पृ. 164

31) भावे वा. कृ., पूर्वोक्त, पृ. 175

32) कित्ता, पृ. 175

33) कुलकर्णी अ. रा., पूर्वोक्त, पृ.138

34) कित्ता, पृ. 137

35) रानडे म. गो., पूर्वोक्त, पृ. 164-166


 Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief@EIJMR, All rights reserved.